पुढारी

# रवळनाथ हौसिंग फायनान्सचा सन्मान

## 'बँको ब्लू रिबन' पुरस्कार प्रदान

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) प्रधान कार्यालय, गडहिंग्लज संस्थेस 'बँको ब्लू रिबन २०२३' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दमण येथे अविज पब्लिकेशन आणि गॅलेक्सी इन्मा, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सहकार परिषदेत माजी सहकार आयुक्त मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते रवळनाथचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

अविज पब्लिकेशन कोल्हापूर ही संस्था सहकार क्षेत्रासाठी देशपातळीवर एक मार्गदर्शक संस्था म्हणून १९९९ पासून काम करते. या संस्थेमार्फत प्रतिवर्षी सहकार क्षेत्रात देशपातळीवर उत्कृष्ट बँकिंग कामकाज करणाऱ्या संस्थांना पुरस्कार दिले जातात. रवळनाथ हौसिंग फायनान्सने गेल्या आर्थिक वर्षात केलेल्या चौफेर प्रगतीमुळेच हा पुरस्कार प्राप्त झाल्याची माहिती चौगुले यांनी दिली. ३५० ते ५०० कोटी ठेवी असलेल्या



**दमण : माजी सहकार आयुक्त मधुकरराव चौधरी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना एम. एल. चौगुले. शेजारी प्रा. व्ही. के. मायदेव, महेश मजती, प्रा. डॉ. राजेंद्रप्रसाद शिंदे आदी.**

महाराष्ट्रातील मल्टिस्टेट सहकारी संस्थांमधून प्रथम क्रमांक मिळवून हा पुरस्कार प्राप्त झाला. संस्थेच्या संचालक मंडळाने राबवलेले धोरण, संस्थेचे सीईओ डी. के. मायदेव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम, नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब पुरस्कारप्राप्तीसाठी महत्त्वाचा ठरल्याचे स्पष्ट केले.

यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, संचालक महेश मजती, शाखा सल्लागार प्रा. डॉ. राजेंद्रप्रसाद शिंदे, अविज पब्लिकेशनचे अविनाश शिंत्रे, गॅलक्सी इन्माचे संचालक अशोक नाईक आदींसह महाराष्ट्रातील विविध सहकारी बँकिंग संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Feb 17, 2024 Page No. 3
newspaper.pudhari.co.in